समाचार विमोचन

**अतिदक्ष निर्बंध :**

**बुधवार १३ फेब्रुवारी, २००८ संध्याकाळी ५ वाजता ईएसटी (टोरोंटो)**

**बुधवार १३ फेब्रुवारी, २००८ रात्री १० वाजता जीएमटी (लंडन)**

**गुरुवार १४ फेब्रुवारी, २००८ सकाळी ३ वाजून ३० मिनिटांनी आयएसटी (न्यु दिल्ली)**

**भारत धुम्रपानामुळे होणा-या भयंकर रोगाच्या समस्येत अडकलाय : संशोधकांचा अंदाज आहे की २०१० पर्यत तंबाखू मुळे मृत्यूमुखी पडणा-यांची वार्षिक संख्या १ दशलक्ष(दहा लाख) पर्यंत जाईल.**

**नवीन संशोधनाच्या आधारे असे निदर्शनास आले की, २०१० पर्यत तंबाखूमुळे मृत्यूमुखी पडणा-यांची वार्षिक संख्या ९,००,००० होईल व पुढे वाढतच राहिल.**

भारत धुम्रपानाच्या संकटाच्या मध्यावर आहे ज्यामुळे २०१० पर्यत वार्षिक मृत्यू एक दशलक्ष (दहा लाख) पर्यत होईल, ज्यामध्ये ३०-६९ वयोगटातील पाच पुरुषांच्या मृत्यूपैकी एक पुरुष मृत्यू व २० स्त्रियांमध्ये एक स्त्री मृत्यू असेल. सरासरी विडी ओढणारे पुरुष आपल्या आयुष्याची सहा वर्षे, विडी ओढणा-या स्त्रिया आपल्या आयुष्याची आठ वर्षे व सिगारेट ओढणारे पुरुष आपले आयुष्य १० वर्षे गमावतात.

वरील निष्कर्षाप्रमाणे भारतातील पहिल्या राष्ट्रीय तंबाखुच्या प्रतिनिधीत्व संशोधनामध्ये हे निष्पन्न झाले आहे. हे संशोधन भारत, कॅनडा व यु.के. यांनी संयुक्तपणे केले आहे की, जे आज (१३ फेब्रुवारी, २००८) न्यू इंग्लंड जरनल ऑफ मेडिसीन मध्ये प्रकाशित झाले आहे.

भारतातील १.१ दशलक्ष (११ लाख) सॅम्पल घरांमध्ये राष्ट्रीय स्तरावर २००१-२००३ मधील सर्व प्रौढ मृत्यूच्या सर्वेक्षणामध्ये ९०० क्षेत्रकार्यकारी सहभागी झाले होते. संशोधकांनी ७४,००० मृत व्यक्तींच्या धुम्रपानाविषयी माहितीची तुलना जिवंत असलेल्या ७८,००० व्यक्तींच्या माहितीशी केली आहे. या संशोधनातील ३०-६९ वयोगटातील मृत झलेल्या पुरुषांमध्ये :

- क्षयरोगामुळे होणा-या मृत्यूपैकी ३८ टक्के मृत्यू (३११९ पैकी ११७४)
- श्वसन संस्थेच्या रोगामुळे होणा-या मृत्यूपैकी ३१ टक्के मृत्यू (३४८७ पैकी १०७८)
- हृदय विकाराने होणा-या मृत्यूपैकी २० टक्के मृत्यू (५४०९ पैकी ११०२)
- कर्करोगामुळे होणा-या मृत्यूपैकी ३२ टक्के मृत्यू (२२४८ पैकी ७०९)
- अन्य आजारांमुळे होणा-या मृत्यूपैकी २३ टक्के मृत्यू (२५२९० पैकी ५६५१) धुम्रपानामुळे झालेले आढळतात.

सेंटर फॉर ग्लोबल हेल्थ रिसर्चचे मुख्य प्राध्यापक प्रभात झा, सेंट मायकल हॉस्पीटल युनिर्व्हसिटी ऑफ टोरोंटो, कॅनडा, म्हणतात की, धुम्रपानाने होणा-या

भयंकर धोक्याने आम्ही आश्चर्यचकित झालो, भारतातील धुम्रपान करणा-या व्यक्ती अमेरिका किंवा युरोपच्या तुलनेत उशिरा धुम्रपानाला सुरुवात करतात व तेही कमी प्रमाणात करतात. भारतात धुम्रपानामुळे न केवळ कर्करोगानेच तर क्षयरोग व हृदयविकारानेही मृत्यू होतात.

भारतात सुमारे १२० दशलक्ष (१२ कोटी) लोक धुम्रपान करतात. ३० ते ६९ वयोगटातील एक तृतीयांशपेक्षा जास्त पुरुष व सुमारे पाच टक्के स्त्रिया सिगारेट किंवा विडी (ज्या मध्ये सिगारेट मधील तंबाखूच्या पावपट तंबाखू असते व ती टेबुंर्नीच्या पानांमध्ये गुडाळलेली असते) ओढतात.

या संशोधनामध्ये असे निदर्शनास आले की ३० ते ६९ वयोगटातील धुम्रपान करणा-या पुरुषांमध्ये सुमारे ६१ टक्के पुरुष मृत्यूमुखी पडतात व त्याच तुलनेत धुम्रपान न करणारे ४१ टक्के पुरुष मृत्यूमुखी पडतात व याच वयोगटात धुम्रपान करणा-या स्त्रियांमध्ये सुमारे ६२ टक्के स्त्रिया मृत्यूमुखी पडतात व त्याच तुलनेत धुम्रपान न करणा-या ३८ टक्के स्त्रिया मृत्यूमुखी पडतात.

भारताचे आरोग्यमंत्री डॉ. अंबुमनी रामदास म्हणतात, “ मी या संशोधनाच्या निष्कर्षामुळे भयभीत झालो आहे. भारत सरकार तंबाखू सेवनावर नियंत्रणासाठी, विशेषत्वाने गरीब व अशिक्षित लोकांना तंबाखूचे दुष्परिणाम लक्षात आणून देण्यासाठी, सर्व प्रकारे पाऊले उचलण्याचे प्रयत्न करत आहे.” २००१ मधील नोबेल

पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ प्राध्यापक अमर्त्यसेन म्हणतात, ' खरोखरच हे धक्कादायक आहे की, भारतात जवळपास १० पैकी १ मृत्यू धुम्रपानामुळे होतो. जो धुम्रपानासेवन पूर्ण थांबवल्यास टळू शकतो. हे संशोधन या अतिशय उपेक्षित क्षेत्रात तातडीने सार्वजनिक कारवाईची आवश्यकता किती महत्वाची आहे, हे ठामपणे सिध्द करते.

या संशोधनातून असे दिसून येते की धुम्रपान कोणत्याही स्तरावर सुरक्षित नाही. एका दिवसाला काही विडी ओढल्यास बरेचसे धोके आहेत परंतु , त्याहीपेक्षा जास्त धोके सिगारेट ओढल्यास आहे, मध्यम वयात तर मृत्यूचे प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे, असे सुचवण्यात येते की सिगारेट ओढणा-या व्यक्ती सिगारेट न ओढणा-यांच्या तुलनेत आयुष्याची १० वर्षे गमवतात. हेच धोके पाश्चिमात्य देशांतही दिसून येतात.

"धुम्रपानाने मृत्यू होतो पण ते थांबवले तर आरोग्याला लाभदायक ठरते. " ऑक्सफर्ड युनिव्र्हसिटीचे प्राध्यापक व सहलेखक रिचर्ड पिंटो म्हणाले "धुम्रपान करणे थांबवले नाही तर, धुम्रपान करणा-यांमध्ये सुमारे एक चर्तृथांश लोक मध्यम वयात तंबाखूमुळे मृत्यूमुखी पडतील. ब्रिटीश संशोधनात असे दिसून येते की, धुम्रपान थांबवणे आरोग्यासाठी विलक्षण लाभदायक ठरते . "

## *मुख्य निष्कर्ष संक्षिप्तपणे*

- *भारतातील हे पहिले धुम्रपानावर राष्ट्रीय प्रतिनिधित्व असलेले राष्ट्रस्तरीय संशोधन आहे.*
- *भारतामध्ये २०१० पर्यत तंबाखूमुळे मृत्यूमुखी पडणा-यांची वार्षिक संख्या सुमारे वार्षिक १ दशलक्ष (१० लाख) पर्यत जाईल.*
- *एक दशलक्ष मृत्यूपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू हे म्हातारपणाच्या अगोदरचे होतील म्हणजे ७ लाख लोकांचा मृत्यू दर वर्षी ३०-६९ वयात होईल. (६ लाख पुरुष व १ लाख स्त्रिया)*
- *मध्यम वयात (३०-६९ वर्षे) होणा-यां पुरुषांच्या मृत्यूमध्ये ४ पैकी १ पुरुष मृत्यू व स्त्रीयांच्या मृत्यूमध्ये २० पैकी १ स्त्री मृत्यू तंबाखूमळे होतो.*
- *विडी ओढणारे पुरुष सरासरी आपल्या आयुष्याची सहा वर्षे, विडी ओढणा-या स्त्रीया आपल्या आयुष्याची आठ वर्षे व सिगारेट ओढणारे पुरुष आपले आयुष्य १० वर्षे गमवतात*
- *धुम्रपान केल्याने लोक मुख्यत: क्षयरोग, श्वसनसंस्थेचे आजार, हृदय विकारामुळे मरण पावतात तसेच कर्करोगाने ही मृत्यू पावतात.*
- *दिवसाला १ ते ७ विड्या ओढल्याने मृत्यूचे प्रमाण एक तृतीयांश वाढते व दिवसाला १ ते ७ सिगारेट ओढल्याने हाच धोका जवळजवळ दुप्पट होतो.*

- मध्यम वयात होणा-या मृत्यूमधील पुरुष व स्त्रीया मधील अंतर हे जास्तीत जास्त तंबाखूमुळे असते.
- शिक्षित व अशिक्षितांमध्ये आणि शहरी व ग्रामीण भागात हे धोके सारख्याच प्रमाणात आढळून येतात.
- धुम्रपान थांबवणे आरोग्याला लाभदायक ठरते. परंतु भारतात फक्त २ टक्के प्रौढ व्यक्तीनी धुम्रपान करणे सोडले आहे तेही आजारी पडल्यानंतरच.